

सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक को. असोसिएशनतर्फे शिवस्मारक सभागृहात आयोजित कार्यक्रमात गुरुवारी आदर्श बँक व आदर्श मॅनेजर पुरस्काराचे वितरण माजी आमदार सुधाकर परिचारक यांच्या हस्ते झाले. पुरस्कार घेताना मान्यवर.

**पुरस्कार** | जिल्हा नागरी सहकारी बँक को. असोसिएशनतर्फे जिल्ह्यातील आदर्श बँक व व्यवस्थापकांचा गौरव

# डिपॉझीट मिळते, चांगले कर्जदार नाही

## माजी आमदार सुधाकर परिचारक यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । सोलापूर

रिझर्व्ह बँकेचे नियम, एनपीएची मर्यादा व इतर कारणांमुळे सध्याच्या काळात नागरी बँका चालविणे कठीण होत आहे. मात्र ग्राहकांचा विश्वास आणि प्रामाणिक सेवेमुळे नागरी बँकांची वाटचाल चांगल्या पद्धतीने होत आहे. पूर्वी बँकांना डिपॉझीट मिळत नव्हते. परंतु आता डिपॉझीट पुरेशा प्रमाणात मिळत आहे. पण कर्ज फेडणारे चांगले कर्जदार मिळत नाहीत.त्यामुळे बँकेचा कारभार करणे अवघड होत आहे. असे प्रतिपादन माजी आमदार सुधाकर परिचारक यांनी केले.

सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक को. असोसिएशनतर्फे शिवस्मारक सभागृहात आयोजित कार्यक्रमात गुरुवारी आदर्श बँक व आदर्श मॅनेजर पुरस्काराचे वितरण झाले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जिल्हा उपनिबंधक बी. टी. लावंड होते. यावेळी आमदार बबनराव शिंदे, राजगोपाल मिणियार, राजेंद्र कोठावळे, राजगोपाल झंवर, किसन माळी, कल्याणराव काळे आदी उपस्थित होते.

माजी आमदार परिचारक म्हणाले, 'बँकांसाठी ग्राहक, ठेवीदार व संचालक महत्त्वाचे घटक आहेत. कर्मचारी व संचालक यांना आगामी काळात प्रशिक्षण देण्याचे नियोजन आहे. बँकांनी आधुनिकीकरणाचा वापर करावा. इंटरनेट व संगणकीय प्रणालीचा वापर होणे आवश्यक आहे.'

**बँकांनी आधुनिकीकरणाचा स्वीकार करण्याची गरज**

'सोलापूर जिल्हा कष्टकऱ्यांचा आहे. मिळालेल्या उत्पन्नातून काही भाग बचत करतात. अशा बचतीमधूनच जिल्ह्यातील बँकांमध्ये साधारणपणे १० हजार कोटींच्या ठेवी आहेत. त्यामुळे ठेवी ठेवण्यामध्ये सोलापूरचा देशात पहिला क्रमांक लागतो. ठेवीदारांचा विश्वास जतन करणे हेदेखील मोठी जबाबदारी आहे. नागरी बँक त्या प्रामाणिकपणे पार पाडत आहेत. शिवाय ग्राहकांना चांगल्या पद्धतीने सेवा देत आहेत,' असे मत जिल्हा उपनिबंधक बी. टी. लावंड यांनी केले.

### समर्थ बँकेचे उमेश थोब्बी आदर्श मॅनेजर



समर्थ बँकेचे व्यवस्थापक उमेश थोब्बी यांना आदर्श व्यवस्थापकाचा पुरस्कार देण्यात आला. सत्काराला उत्तर देताना थोब्बी म्हणाले, 'ग्राहकांना मनाजोगी सेवा दिली नाही तर ग्राहक राष्ट्रीयकृत बँकांकडे वळतील. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून चांगल्या सुविधा देण्यावर भर दिला पाहिजे. पाहुण्याचा परिचय संचालक अनंत दाते यांनी केला. पंचांगकर्ते मोहन दाते यांनी प्रास्ताविक केले.

### यांना मिळाला पुरस्कार

आदर्श बँक प्रथम पुरस्कार- निशिगंधा सहकारी बँक लि., पंढरपूर, सांगोला अर्बन को-ऑप बँक लि., सांगोला, लोकमंगल को-ऑप. बँक, सोलापूर, समर्थ सहकारी बँक सोलापूर यांना विभागून मिळाला. द्वितीय पुरस्कार कृषी सेवा अर्बन को- ऑप. बँक कोळे, शरद नागरी बँक सोलापूर, शिवशक्ती अर्बन को-ऑप बँक बार्शी व विद्यानंद को- ऑप बँक, मनोरमा बँक व विकास सहकारी बँक, सोलापूर जनता बँक व पंढरपूर अर्बन बँक यांना विभागून देण्यात आले. तृतीय पुरस्कार सद्‌गुरू गहिनीनाथ अर्बन बँक अकलूज, माढेश्वरी अर्बन डेव्ह. को. बँक माढा, व दि लक्ष्मी को-ऑप बँकेला देण्यात आला. स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते. तर आदर्श मॅनेजर म्हणून उमेश थोब्बी यांना पुरस्कार देण्यात आला.